::: प्र मा ण प त्र :::

प्रमाणित करण्यात येते की, कु. सलमा गौस अपराध यांनी "गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनाचे विशेष" या विषयावरील प्रबंधिकेचे संशोधनकार्य समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

कु. सलमा गौस अपराध यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या ही प्रबंधिका लिहिली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरची प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. (मराठी) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

२८ जून ९३.

प्रा.डॉ. रोहिणी तुकदेव,
मार्गदर्शिका

सांगली.
दिनांक:

:::::

::: प्रतिज्ञापत्र :::

"गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनाचे विशेष" या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

इचलकरंजी.

दिनांक:

कु. सलमा गौस अपराध,

अभ्यासक.

::::::

## :: ऋण निर्देश ::

शिवाजी विद्यापीठाला सादर करण्यासाठी प्रस्तुत प्रबंधाविषयीचा अभ्यास करताना अनेकांनी अनेकपरीने विविध स्वरूपाची मदत केली. अनेकांचे प्रोत्साहन व सहकार्य लाभले त्यांचा ऋणनिर्देश करणे मी माझे आद्यकर्तव्य समजते.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख सन्माननीय डॉ. गो.मा. पवार आणि आजी विभागप्रमुख सन्माननीय डॉ. ल.रा. नसिराबादकर या द्वयांची प्रेरणा व प्रोत्साहन लाभले. त्यांची मी ऋणी आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या विषय निवडीपासून प्रबंधाच्या पूर्ततेपर्यंत वेळोवेळी सूचना देऊन मौलिक मार्गदर्शन करणाऱ्या आदरणीय मार्गदर्शिका डॉ. रोहिणी तुकदेव यांचे हे ऋण शब्दात व्यक्त न करता येण्याजोगेच आहे.

माझ्या संशोधन विषयासंबंधी प्रा. कमल देसाई, प्रा. विश्वनाथ शिंदे, प्रा. प्रभाकर पाटील, प्रा. शांताराम शेलार यांनी वेळोवेळी केलेल्या चर्चेचा प्रबंध लेखनाला अतिशय उपयोग झाला.

नेहमीच अडचणीच्यावेळी अंतरिक जिव्हाळ्याने मदतीचा हात देणारे माझे आदरणीय गुरुवर्य ग.बा. भोसले आणि प्रा. शं.ना. पाटील यांचे ऋण फारच मोलाचे आहेत.

खडतर जीवनाशी सामना देत असताना सुध्दा माझ्या विषयीचे एक वेगळे स्वप्न ज्यानी उराशी बाळगले, त्यांच्या या तपश्चर्येमुळेच त्यांचे हे स्वप्न या प्रबंधाच्याद्वारे मी साकार करु शकले ते माझे आई, बाबा, माझे स्नेही आदरणीय नरेन्द्र वाघमळे, माझे बंधू व बहिणी यांचा भक्तिभावनेने उल्लेख करते. त्यांनी तर मला कायमचेच ऋणात ठेवले आहे.

या प्रबंध लेखनासाठी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, आपटे वाचन मंदिर इचलकरंजी, श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलिजचे ग्रंथालय, सांगली नगर वाचनालय या ग्रंथालयांचे मोलाचे सहाय्य लाभले.

या प्रबंधाच्या पूर्ततेपर्यंत अनेक शुभचिंतकांनी व स्नेही मंडळींनी मदतीचा हात पुढे केला. त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते. विशेषत: श्रीयुत चंद्रकान्त ओंबासे, विलास पाटील, अशोक उपाध्ये यांची मी ऋणी आहे.

श्री. विष्णू खाडे यांनी टंकलेखन करून दिले व हेमंत मुद्रणालय यांनी चांगल्याप्रकारे मुद्रण करून दिले त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानते.

-- कु. [illegible]

# प्रास्ताविक

गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनाच्या विशेषांचा शोध घेणे हा प्रस्तुत लघुप्रबंधाचा उद्देश आहे.

१९६० नंतरच्या मराठी वाङ्मयातील प्रभावी कथालेखिका म्हणून गौरी देशपांडे यांचा उल्लेख केला जातो. नवकथेनंतरच्या कथेचा विचार करावयाचा झाला तर गौरी देशपांडे यांच्या कथेचा विचार करणे अपरिहार्य ठरते. १९६० पूर्वीच्या कथेपेक्षा ही कथा अनेक दृष्टीने वेगळी आहे. असे सकृत-दर्शनीच जाणवते. स्त्रीने केलेले स्त्रीच्या अनुभवाचे चित्रण म्हणून त्यांचे वाङ्मय महत्वपूर्ण आहे हे तर खरेच परंतु त्यांच्या साहित्याचे हे एकच वैशिष्ट्य आहे असे नाही. अनुभवांचे नाविन्य, विशिष्ट अशी वैचारिक बैठक, मांडणी-ची वैशिष्ट्यपूर्णपध्दती आणि भाषेचे पर्याप्त उपयोजन ह्या सर्व गोष्टींमुळे त्यांची कथा वैशिष्टपूर्ण ठरली आहे. असे असले तरी अद्यापपर्यंत गौरी देशपांडे यांच्या कथेच्या स्वरूपवैशिष्टयांचा विस्ताराने विचार केला गेलेला नाही. काही ठिकाणी स्फुट स्वरूपात केलेले तुरळक प्रयत्न आढळतात. म्हणून १९६० नंतरच्या काळात लेखिका म्हणून स्थान प्राप्त केलेल्या या लेखिकेच्या कथात्म वाङ्मयाचे विशेष विस्ताराने अभ्यासणे प्रस्तुत ठरेल अशा धारणेने निवडलेला हा विषय युक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

खरं तर, गौरी देशपांडे यांच्या सर्व कथात्म वाङ्मयाच्या विशेषांचा विचार करणे हा विषय मोठा आहे. परंतु लघुप्रबंधाची मर्यादा ध्यानात घेऊन या विषयाला थोडे मर्यादित करणे आवश्यक ठरेल. या विचाराने गौरी देशपांडे यांची प्रत्येक कलाकृती घेऊन तिची स्वरूप वैशिष्ट्ये पहाणे आणि त्याचे भलेबुरेपण आजमावणे अशी पध्दती न स्वीकारता कथेच्या रूपाच्या घटकांच्या अनुषंगाने विचार करण्याची पध्दती प्रस्तुत प्रबंधात स्वीकारला आहे. आणि त्या त्या रूपाच्या घटकाच्या संदर्भात जी साहित्यकृती वैशिष्ट्यपूर्ण

वाटेल त्या साहित्यकृतीला नमूना म्हणून स्वीकारून विचार केला आहे. म्हणून हे गौरी देशपांडे यांच्या सर्व साहित्यकृतींच्या रूपाच्या वैशिष्टयांचे सामग्र्याने केलेले विवेचन नाही तर ते आवश्यक त्या साहित्यकृती नमूना म्हणून स्वीकारून केलेले विवेचन आहे. हे येथे नम्रपणे नमूद करणे आवश्यक आहे.

प्रथम दर्शनी जाणवलेली गोष्ट अशी की, गौरी देशपांडे यांनी आपल्या काही साहित्यकृतींचा उल्लेख कादंबरी असा केलेला असला तरी (उदा. एकेक पान गळावया, तेरुओ आणि काहि दूरपर्यंत, निरगाठी आणि चंद्रिके ग सारिके ग, दुस्तर हा घाट आणि थांग) कथा आणि कादंबरी या वाङ्‌मय प्रकारांची स्वरूप वैशिष्टये लक्षात घेऊन त्यांचा विचार केला तर असे स्पष्ट होते की, त्यांना कादंबरी या वाङ्‌मय प्रकारात समाविष्ट करण्या-ऐवजी कथा या वाङ्‌मय प्रकारात समाविष्ट करणे प्रस्तुत ठरेल. म्हणूनच प्रस्तुत प्रबंधामध्ये त्यांना "कथा" समजून विचार केलेला आहे.

वरील भूमिकेला अनुसरून गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाङ्‌मयाचा विचार करताना आशयसूत्रे, व्यक्तिचित्रणे, निवेदनपध्दती व भाषा या कथेच्या रूपाच्या घटकांच्या अनुषंगाने नमुना म्हणून स्वीकारलेल्या साहित्यकृतींची चिकित्सक पहाणी करून निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

........